Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षण व पर्यावरण संरक्षणासाठी उपाययोजना

**प्रा. आर. डी. बरकले,**
**ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविदयालय, नाशिक.**

**प्रास्ताविक :**

पर्यावरण संरक्षण हा शब्द शिक्षणक्षेत्रात पूर्वीपासून वापरला जातो. आपल्या देशाच्या ज्या समस्या असतात त्या आपण शिक्षणाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करतो व आज आपल्यासमोर जी महत्त्वाची समस्या निर्माण झाली आहे ती म्हणजे पर्यावरणाचा प्रचंड मोठया प्रमाणात होत असलेला ऱ्हास. पर्यावरणाचा ऱ्हास होण्याची जी अनेक कारणे आहेत त्यात महत्त्वाचे कारण म्हणजे वाढती लोकसंख्या. मानव एकमेव प्राणी असा आहे की तो निसर्गाकडून बरेच काही घेतो देत मात्र काहीच नाही म्हणून पर्यावरणाचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे, प्रत्येकाची ती जबाबदारी आहे. शासन, शाळा, महाविदयालयामध्ये पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

पुरातन काळापासून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. पर्यावरणाचे महत्त्व माहित असूनसुध्दा पर्यावरणविषयक समस्या इतकी भयानक का निर्माण झाली? तर आईन्स्टानच्या शब्दांत " हे केवळ मानवाच्या अचाट मूर्खपणामुळे " सध्याचे पर्यावरण प्रदुषित असून मानवासहित सर्व सजीवांना ते घातक आहे अशा परिस्थितीमुळेच ' पर्यावरण शिक्षण ' आज महत्त्वाचे व गरजेचे झाले आहे.

**पर्यावरण शिक्षण : अर्थ**

" पर्यावरणीय प्रदूषणावरील ब्रिटीश रॉयल कमिशनच्या पहिल्या अहवालात असे नमूद करण्यात आले की, पर्यावरणासाठी सर्वोत्तम विमा म्हणजे, लोकांच्या वतीने, हवा, पाणी व जमिनीचा ऱ्हास थांबविण्यासाठी वचनबध्द होणे. "

पर्यावरण शिक्षणाचे चार प्रमुख घटक आहेत . पर्यावरणविषयक जाणीवजागृती, प्रत्यक्ष जीवनातील प्रसंग, पर्यावरणाचे संरक्षण आणि चिरस्थायी शाश्वत विकास, यापैकी पर्यावरणविषयक जाणीवजागृती म्हणजे व्यक्तीला पर्यावरणाविषयी आणि त्याच्या समस्यांविषयी जागरुक बनवणे. यात पर्यावरणविषयक ज्ञानप्राप्ती अपेक्षित आहे. ज्यायोगे पर्यावरणाचे जतन, संरक्षण व त्याचा विकास होण्यास मदत होईल.

व्यक्तीने स्वतःच्या परिसराशी सर्वतोपरी आंतरक्रिया साधणे व त्याचवेळेस स्वतःची मानसिक जडणघडण सुधारणे या दोन गोष्टी पर्यावरण शिक्षणातून साधणे शक्य झाले पाहिजे. यासाठी शिक्षणाच्या आशयात, स्वरुपात व

पध्दतीत बदल होणे आवश्यक आहे. पर्यावरण शिक्षण हे शिक्षणाचा एक निव्वळ भाग नसून त्याचे एक नवीन प्रमुख लक्षण आहे.

**पर्यावरण शिक्षणाची व्याख्या :**

पर्यावरण शिक्षणाची व्याख्या देतांना शैक्षणिक संशोधनाच्या विश्वकोशात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे – अभ्यासक्रमाच्या इतर क्षेत्रांप्रमाणे पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा आशय कधीच स्पष्टपणे मांडला गेला नाही. त्यामुळे पर्यावरण शिक्षण ही सोपी बाब नाही. जीवशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इ. च्या समन्वयातून पर्यावरण शिक्षण हा विषय आंतरविदयाशाखीय स्वरुपाचा असा तयार झाला पाहिजे.

अमेरिकेच्या पर्यावरण शिक्षणाच्या कायदयात (१९७०) मांडलेली दिसते या कायदयाच्या संदर्भात, पर्यावरण शिक्षण म्हणजे मानवाचा त्याच्या नैसर्गिक व मानवानिर्मित परिसराशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणारी एक प्रकिया होय यामध्ये संपूर्ण मानवी पर्यावरणाचा लोकसंख्या, प्रदूषण, साधनसंपत्तीचे वितरण, ऱ्हास व संरक्षण, वाहतूक यंत्रणा, तंत्रविज्ञान तसेच शहरी व ग्रामीण नियोजन यांच्याशी असणारा संबंधही अभिप्रेत आहे.


सारांश नैसर्गिकरित्या जीवन जगता येईल. निसर्गातील सौंदर्य चिरस्थायी असेल पुरेशी साधनसंपत्ती उपलब्ध असेल असे जग पुढच्या पिढीला प्रदान करता आले पाहिजे. यासाठी पर्यावरण शिक्षणाची नितांत गरज आहे.

**पर्यावरणाचे महत्त्व :**


वाढती लोकसंख्या, वाढते औदयोगिकीकरण आणि वाढते प्रदूषण यामुळे अलिकडील काळात पर्यावरणाच्या प्रश्नाने गंभीरस्वरुप धारण केले आहे? भूक लागली असता जेवण करणे ही प्रवृत्ती आहे. स्वतः उपवासी राहून आपला घास दुसऱ्यास देणे ही संस्कृती आहे, तर आवश्यकता नसतांनाही दुसऱ्याचा घास हिरावून घेणे ही विकृती आहे, आवश्यकता नसतांना अनेक वस्तुंचा संग्रह करीत बसणे ही सुध्दा एक विकृतीच आहे व अशा अनेक प्रकारच्या विकृतींनी मनुष्य आज ग्रस्त झालेला आहे. " सृष्टी सर्व जीवांचे पालन पोषण करण्यास समर्थ आहे परंतु एकासुध्दा व्यक्तीच्या अधाशीपणाची पूर्ती करण्यास ती असमर्थ आहे. " असे महात्मा गांधी म्हणत असत. यामागील भूमिका अशी की, मनुष्याच्या अधाशीपणाला कोणतीही सीमा नाही. आधुनिकीकरणाच्या हव्यासापोटी प्रदुषण करणारे अजस्त्र उदयोग उभारुन तर कधी शोकाखातर वन्य प्राण्यांची शिकार करुन तर कधी मौजेखातर निसर्गाचे शोषण करुन मानवाने तो कोणत्या थराला जाऊ शकतो याचे पुरावे पावलो पावली उपलब्ध करुन दिले आहेत.

अलिकडील काळात पर्यावरणात मनुष्याचा हस्तक्षेप कमालीचा वाढला आहे व त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे. यामुळे पुढील समस्या निर्माण झाल्या आहेत.

IJJS Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015




समस्या कितीही मोठ्या असल्या तरी त्यांचे निराकरण शिक्षणाने करता येते म्हणूनच पर्यावरण विषयक समस्यांवर मात करण्यासाठी पर्यावरण शिक्षण हा विषय विकसित करण्यात आला. शिक्षण ही जीवनाची संपूर्ण तयारी होय असे मानले जाते. पर्यावरण हे मनुष्य जीवनाशी अत्यंत निगडीत आहे हे पुढील आकृतीवरुन दिसून येते.



Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**बालकाला पर्यावरण संरक्षणासाठी उपाययोजना :**

१) घरापासूनच स्वच्छतेची सवय लावणे आवश्यक.

२) आपले आरोग्य स्वच्छतेवर अवलंबून आहे याची जाणीव बालकाला करुन दयावी.

३) शाळेत स्वतःचा वर्ग व परिसर स्वच्छ कसा करता येईल किंवा राहील यासाठी बालकाने काळजी घ्यावी.

४) प्राथमिक शाळेतच वृक्षदिंडीत सहभाग घ्यावा व एकातरी झाडाची जोपासना घरी किंवा शाळेत प्रत्येकाने करावी.

५) प्रदुषणामुळे होणारे आजार याविषयी शिक्षकांनी विदयार्थ्यांना व्यवस्थित अध्यापन करावे.

६) विविध पोस्टर्स तयार करुन त्याव्दारे विदयार्थ्यांना प्रदुषणाविषयी माहिती दयावी किंवा विविध प्रदुषणविषयक पोस्टर्स विदयार्थ्यांकडून तयार करुन घ्यावे.

७) घराजवळील स्वच्छता करावी. पशु, पक्षी, प्राणी हे पर्यावरणाचे संरक्षण करतात हे माहित असावे आपण त्यांचे संरक्षण करावे.

८) पर्यावरणामुळे वैयक्तिक व सामूहिक स्वास्थ्याचे रक्षण होते हे माहित असावे.

९) पर्यावरण संरक्षणाचे प्रशिक्षण आयोजित करावे.

१०) प्रदुषणामुळे होणाऱ्या आजाराची माहिती असावी. त्यामुळे पर्यावरण संरक्षणावर व स्वच्छतेवर भर दिला जातो.

११) पर्यावरण दिन उत्साहात साजरा करावा.

१२) लोकसंख्या वाढ व लोकसंख्या वाढीची कारणे, समस्या या सर्वांची माहिती असावी कारण लोकसंख्या वाढीचा पर्यावरणाशी फारच जवळचा संबंध आहे.

१३) शासकीय प्रयत्नांबरोबरच अशासकीय संघटनांकडूनही पर्यावरण संरक्षणासंबंधी प्रयत्न करावे. ' चिपको ' आंदोलनासारख्या काही मोहिमा अशासकीय संघटनांच्या मार्फत किंवा वैयक्तिक प्रयत्नांतून साकार होणे गरजेचे आहे.

१४) विदयार्थ्यांना भिन्न भौगोलिक परिस्थितीचे व त्यावरील समस्यांचे ज्ञान करुन देणे.

१५) गणेशाच्या आगमनाच्या वेळी एक गाव एक गणपती ही योजना अंमलात आणावी.

१६) गणपतीचे विसर्जन नदीमध्ये करु नये.

१७) शिक्षकांनी शालेय स्तरावर हवा प्रदुषण, ध्वनी प्रदुषण, जलप्रदुषण याचे कारणे, परिणाम, उपाय याविषयी माहिती दयावी.

१८) जागतिक पर्यावरण दिन ५ जून हा नागरिक पर्यावरण दिन शाळा व महाविदयालयातून साजरा करण्यात यावा.

१९) 'आपला परिसर – स्वच्छ परिसर ' या संकल्पनेस वास्तवात आणण्यासाठी जनजागृती करावी.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

२०) आरोग्य शिबीराचे आयोजन करावे.

**समारोप :**

वरील उपाय जरी पर्यावरण संरक्षणासाठी असले तरीही आपण सर्वांनी आपल्यापासूनच पर्यावरणाचा ऱ्हास कसा होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे या सर्वांमध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे व त्यादृष्टीने आता स्वच्छता अभियान सुरु झाले आहे हे स्वागतार्ह आहे.

**संदर्भ :**

१. पर्यावरण शिक्षण : डॉ. के. एम. भांडारकर.
२. पर्यावरण शिक्षण : डॉ. हेमलता पारसनीस, डॉ. जयश्री बहुलीकर.
३. पर्यावरण दिनविशेष : प्रा. सतीश शिर्के.
४. पर्यावरण शिक्षण : डॉ. हेमलता पारसनीस.